**तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. २/२०२४**
**निशाणी क्र. ३५**

**महाराष्ट्र शासन** तर्फे पो.स्टे. घाटंजी सरकारी अभियोक्ता
..वि..
**राजेश रामचंद्र अग्रवाल** आरोपी.

| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ४** | |
|---|---|
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | निलेश देविदास सुरडकर |
| वय अंदाजे ४२ वर्षे | धंदा- नौकरी, पोलीस निरीक्षक, पो.स्टे, आर्णी |
| राहणार | आर्णी, ता. आर्णी, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री.व्ही. एस. तेलंग सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

दिनांक ११/०७/२०२३ रोजी मी घाटंजी पोलीस स्टेशनमध्ये पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी मी ***प्रोहिबीशन–जुगार*** धाड टाकण्याकरीता पेट्रोलींग ड्युटीवर होतो. त्यावेळेस आम्हाला माहिती मिळाली की राजेश अग्रवाल यांच्या आठवडी बाजारातील दुकानामध्ये ***दादाजी डेली निड्स*** नावाचे दुकान आहे व त्या दुकानामध्ये प्रतिबंधित तंबाखु, गुटखा विक्रीकरीता उपलब्ध आहे. त्यामुळे मी दोन पंचांना बोलावुन तेथे पोलीस कर्मचा–यांसह गेलो. त्यानंतर आम्ही त्या दुकानाची झडती घेतली असता त्या दुकानामध्ये शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखु आढळला व त्याची किंमत अंदाजे १,३९,३१२/– होती व तो तंबाखु मी जप्त केला. जप्ती पंचनामा आता मला दाखवला, त्यावर माझी, पंचांची व आरोपीची सही आहे व तो निशाणी क्रमांक २९ वर आहे. त्यानंतर मी अन्न सुरक्षा अधिका–यांना घटनेची माहिती पत्राव्दारे व फोनव्दारे दिली. ते पत्र आता मला दाखवले, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **ते निशाणी क्रमांक ३६ वर आहे**.

२. दुस–यादिवशी अन्न सुरक्षा अधिकारी श्री दंदे हे पोलीस स्टेशनला आले व त्यांनी जप्त केलेल्या मालाची तपासणी केली. नंतर त्यांनी आरोपीच्याविरोधात लेखी कैफियत दिली. आता मला ती कैफियत दाखवली, त्यावर माझा शेरा व सही आहे व ती

कैफियत निशाणी क्रमांक १८ वर आहे. त्या कैफियतीच्या आधारे आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून प्रथम खबर अहवाल निशाणी क्रमांक १९ वर माझी सही आहे. त्यानंतर मी आरोपीला अटक केली. अटक फॉर्म मला आता दाखविला, त्यावर माझी, पंचांची व आरोपीच्या सह्या असून **तो निशाणी क्रमांक ३७ वर आहे.** त्यानंतर आरोपीची वैद्यकीय तपासणी करण्याकरीता वैद्यकीय अधिका–यांना मी पत्र दिले, ज्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक ३८ वर आहे**. त्यानंतर अन्न सुरक्षा अधिका–यांना सि.ए. तपासणीकरीता पाठवण्यात आलेल्या पत्राची साक्षांकित प्रत मिळण्याकरीता मी पत्र दिले होते, ज्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक ३९ वर आहे**. त्यानंतर मी आरोपीच्याविरोधात पुरावा मिळून आल्याने मी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आज न्यायालयात आरोपी हजर आहे.

**उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. पी.साबळे यांचे मार्फत सुरु –**

३. मला निश्चीत माहिती नाही की अन्न सुरक्षा मानके अधिनियम अन्वये मला या प्रकरणामध्ये कारवाई करण्याचा अधिकार आहे किंवा नाही. दिनांक ११/०७/२०२३ रोजी दखलपात्र गुन्हा घडल्याचे मला निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ११/०७/२०२३ रोजी मी शासनातर्फे कैफियत दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की मला कैफियत देण्याचा अधिकार नसल्यामुळे मी कैफियत दिली नाही. मला कल्पना आहे की दखलपात्र गुन्हा घडल्यावर ताबडतोब गुन्हा नोंदवावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की मला अन्न सुरक्षा मानके अधिनियमांन्वये या प्रकरणामध्ये कारवाई करण्याचे अधिकार नसल्यामुळे मी अन्न सुरक्षा अधिका–यांना त्याबाबत कळविले. परिपत्रक आल्यामुळे मी अन्न सुरक्षा अधिका–यांना त्याबाबत कळविले होते. परिपत्रक दोन तिन वर्षा अगोदर आले होते. मला आठवत नाही की त्या परिपत्रकामध्ये फक्त अन्न सुरक्षा अधिका–यांना कारवाईचे अधिकार आहे असे नमूद आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०७/२०२२ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रानूसार मला कारवाई करण्याचा अधिकार नाही. दिनांक ११/०७/२०२३ रोजी मी

ज्या व्यक्तीपासून माल जप्त केला, त्या व्यक्तीला मी अटक केली नाही. हे म्हणणे खरे आहे की दखलपात्र गुन्हा घडल्यावरही मी त्या व्यक्तीला अटक केली नाही. हे म्हणणे खरे नाही की माल जप्त न झाल्यामुळे त्या व्यक्तीला मी अटक केली नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की ज्या दुकानामधून मी प्रतिबंधित माल जप्त केला ते दुकान नगर पालीकेच्या मालकीचे होते. साक्षीदार नंतर स्वतः सांगतात की ते दुकान नगर परिषदेच्या कॉम्पलेक्समध्ये आहे. मी सांगू शकत नाही की ते दुकान नगर पालीकेने भाडयाने दिलेले आहे. घटनास्थळ जप्ती पंचनामा निशाणी क्रमांक २९ मध्ये असे नमूद केलेले आहे की ते दुकान नगर परिषदेने भाडयाने दिलेले आहे. ते दुकान नगर परीषदेने कोणाला भाडयाने दिलेले आहे याबाबत मी दस्तऐवज मिळविलेले नाही. ज्या दुकानातून मी माल जप्त केला त्या दुकानाचे नाव **दादाजी सुगंध सेंटर** असे नव्हते. साक्षीदार स्वतः सांगतात मी त्या दुकानाचे नाव **दादाजी डेली निड्स** असे होते.

६. त्या दुकानाची झडती घेण्याच्या अगोदर मी व पंचांनी झडती दिली नव्हती. तसेच त्या दुकानाच्या आजुबाजुच्या दुकानदारांकडे मी चौकशी केली नाही. मी अन्न सुरक्षा अधिका–यांना पत्र देवून, या प्रकरणामध्ये नियमानूसार कारवाई करण्याची विनंती केली. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की मी आरोपीच्या दुकानामधून १,३९,३१२/– रुपयांचा तंबाखु गुटखा जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की त्या दुकानासोबत आरोपीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की मला अधिकार नसतांनाही मी गैर कायदेशीर कारवाई केली. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी कारवाई केली व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपासणी–काही नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

दिनांक – १२/०१/२०२६ (पि.एस. इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.